## यू. जी. सी. (दिल्ली) विभागीय कार्यालय पुणे
## मराठी लघुशोधप्रकल्प सादर करीत आहे

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**विषय**

# तिरमल (नंदीवाला) समाजाचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास (अ. नगर जिल्ह्याचा संदर्भात)


**अभ्यासक**

**प्रा.डॉ. निवृत्ती विनायक मिसाळ**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर

**प्राचार्य**

**डॉ. गोरक्षनाथ कल्हापुरे**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर


**मे - २०१४**

Scanned by CamScanner

## कालावधी सन २०१२-१३ व १३-१४ (दोन वर्ष)

-:सारांश :-

महाराष्ट्रामध्ये सर्वच जिल्हयात तिरमल समाज विखुरलेला आहे. अशा विखुरलेल्या समाजाचे मुल्यमापन करावयाचे झाल्यास त्यांच्या आर्थिक संपन्नते बरोबरच सांस्कृतिक वारसा देखील विचारात घेतला जातो. सांस्कृतिक वारसा हा लिखित व अलिखित स्वरुपात असतो. निति,मुल्ये,रुढी,परंपरा या अलिखित स्वरुपात साहित्य असते. साहित्य हा समाजाचा आरसा आहे. बोली भाषा जशी ही दोन व्यक्ती मधिल विचारांचे आदन प्रदान करण्याचे माध्यम आहे. तसेच साहित्य देखील समूह मनाच्या विचारांचे माध्यम आहे. विखुरलेल्या समाजाला भाषा जशी एका ठिकाणी आणते तसेच समूहाच्या प्रत्येक घटनांची नोंद घेऊन तीला मान्यता देते.

तिरमल समाजाचे लोक आंध्र, तामिळनाडू , महाराष्ट्र इ. राज्यामध्ये आढळून येतात. यांचा मुख्य व्यवसाय नंदीबैलाचा असून ते एन.टी . या मध्ये समावेश असतो.पुर्वी या समाजामध्ये मोठया प्रमाणात जात पंचायत भरत असत – परंतू अलिकडच्या काळामध्ये ती प्रथा संपुष्ठात येतांना दिसते. पुरुषा प्रमाणेच स्त्री ही काटक असते. ती पोथी,बिबवे, सुया विकते. व काही स्त्रिया या भिक मागण्याचे काम करतात तर काही स्त्री या पुरुषांबरोबर शिकारीला जातात. फार अत्यल्प प्रमाणात स्त्री या हया आपल्या पती बरोबर दारु पितात. माळरानावर कोठेतरी पाल ठोकून आपला संसार थाटत असतात. अलिकडच्या काळात हा समाज स्थीरावल्या सारखावाटतो व आपल्या पारंपारीक व्यवसाया पासून परावृत्त होऊन म्हैसपालणांचा व्यवसाय मोठया प्रमाणात करतांना अहमदनगर जिल्हयात दिसतो. स्त्री गवत घेणे व म्हशींची देखभाल करण्याचा व्यवसाय स्त्री करते.

सामाजीक हीन दर्जा प्राप्त असल्याचे दिसून येते. त्याची कारणे पुढिल प्रमाणे :-

१. अज्ञान.
२. दारीद्रय.
३. शिक्षणाचा अभाव.
४. अंधश्रध्दाळू.
५. हीन दर्जाचे राहणीमान.
६. सामाजीक प्रतिष्ठा नाही.
७. बालविवाह आजही दिसतो.
८. गावामध्ये एका बाजूला घरे -
९. तिरमल वस्ती म्हणून त्यांच्या भागाला ओळखले जाते.
१०. गावात त्यांच्या शब्दाला मान नाही.

Scanned by CamScanner

११. भौतीक नागरी संस्कृती पासून आजही दूर.
१२. स्त्रियांचे राहणीमान हीन दर्जाचे आहे.
१३. भटकंती मुळे वैयक्तिक जीवन नाही.
१४. अंगाचा वास येतो.
१५. गांव कारभार राजकारणापासून चार हात लांब.
१६. भाबडे व प्रामाणिक –
१७. नागरी सुविधांचे आकर्षण नाही.

वरील सर्व कारणांमुळे समाजात हीन दर्जा प्राप्त झाला आहे.

सांस्कृतिक जीवनामध्ये धार्मिक जीवन, कला क्रिडा , साहित्य इ. क्षेत्रामध्ये आपले सांस्कृतिक जीवन इतरांपेक्षा कसे वेगळे आहे हे दाखवून दिले . धार्मिक जीवनांमध्ये आपले सन,उत्सव,विधी या मध्ये कार्यक्रम लोकसंस्कृतितून लोकसाहित्यात भर पडली त्यातील आपले देवधर्म राममामा, महालक्ष्मी,मम्मादेवी इत्यादी देवांना पुजतात. व आपल्या भक्तीच्या रूपांने मनोकामना पुर्ण होते अशी या समाजाची समजूत आहे. देवावर या समाजाची अपार श्रध्दा आहे.

समाजाच्या खालील गोष्टींच्या उणिवा दिसून आल्या :-

१. अहमदनगर जिल्हयातील तिरमल समाज शैक्षणीक दृष्टया खुपच मागासलेला दिसून आला आहे.
२. जिल्हयात एकूण साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहे.
३. अहमदनगर जिल्हयातील तिरमल समाजातील महिलांचे साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहे.
४. मुलीच्या शिक्षणात या समाजाता अनास्था दिसून आली.
५. राजकिय क्षेत्राात रस दिसून येत नाही.

अशा प्रकारे जिल्हयात या समाजाच्या उणिवा दिसून आल्या.

Scanned by CamScanner